॥ वाट पाहुन नयन सख्या शिणले ॥

गायिकाः उषा मंगेशकर आणि कोरस
गीतः योगेश
संगीतः राम कदम

शालू भरजरी नेसुन आले
कानी कर्ण फुले,
नथ ही ल्याले,
श्रृंगार करूनी घाई घाईने
रंग महाली उभी राहिले
वाट पाहुन नयन सख्या शिणले
राती रडुन एकली मी निजले ॥ धृ. ॥

कोरसः किती किती वाट बघितली माझ्या बाईनं
आता भावजी थोडं तरी ऐका

चाहुल येता कानोसा घेते,
मन आतुन हरकुन जाते,
मदनाची लहर सरसरते
पण हे सारे वाया गेले ॥ १ ॥

केली शेज फुलांची छान
जाई शेवंती मदन बाण
तबकी हार लावियले पान
सारे मज सम सुकुनी गेले ॥ २ ॥

शुक्र आभाळी लुकलुकला
चांद ही गेला मावळतीला
नाहीं चंद्र मनींचा आला
चांदणे काळोख्यात बुडले ॥ ३ ॥